॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

Grade - B (2.88)
(NAAC Re-Accredited)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## *द्वितीय वर्ष बी. एफ. ए. (ॲप्लाईड आर्ट)*
## *अभ्यासक्रम*

( जून २०१० पासून )

# द्वितीय वर्ष उपयोजित कला (सुधारीत अभ्यासक्रम)

द्वितीय वर्ष उपयोजित कला या वर्गात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार ७५ टक्के हजेरी व वर्गकाम आवश्यक असून ते पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास वार्षिक परीक्षेस बसता येईल. ही अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. वर्गकामात ४०% गुण आवश्यक आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला परीक्षेत प्रत्येक विषयात ३५ टक्के गुण आवश्यक असून त्यापेक्षा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यास अनुत्तीर्ण धरण्यात येईल. ही अट प्रात्यक्षिक (Practical) व सैध्दांतिक (Theory) या दोन्ही विषयांना लागू राहील.

## द्वितीय वर्ष उपयोजित कला (सुधारित अभ्यासक्रम) वार्षिक परीक्षेचे नियोजन

## ( आवश्यक विषय व गुणांचा तक्ता) परीक्षेचा पॅटर्न

| अ. क्र. | विषय ( Subject ) | एकूण तास | वर्गकामाचे गुण | परीक्षेचे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | **सैधंतिक विषय ( Theory )** | | | | |
| १. | जाहिरात कला आणि कल्पना (Advertising Art & Ideas) | ३ | २० | ८० | १०० |
| २. | दृककला विचार प्रसारण शास्त्र व इतिहास (History of Visual Communication) | ३ | २० | ८० | १०० |
| | **प्रात्यक्षिक विषय ( Practical Subject )** | | | | |
| ३. | मानवी शरीर रेखाटनाचा अभ्यास (Drawing from Life/Full figure study) | ५ | २० | ८० | १०० |
| ४. | अक्षरांकन व सुलेखन (Lettering Typography & Calligraphy) | १० | २० | ८० | १०० |
| ५. | वेष्टन/आवरण संकल्प (Package Design) | ५ | २० | ८० | १०० |
| ६. | दृकविचार प्रसारण संकल्प (Communication Design) | १० | २० | ८० | १०० |
| ७. | माहितीयुक्त संकल्प (Information Design) | ५ | २० | ८० | १०० |
| | एकूण गुण | | १४० | ५६० | ७०० |

## वार्षिक परीक्षेत सर्व विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी गुणांची आवश्यकता :-

१. सैधंतिक विषयात (Theory) व वर्गकामामध्ये लेखी स्वाध्याय (Tutorials) यामध्ये कमीत कमी ४० टक्के गुण आवश्यक असून परीक्षेतही ३५ गुण आवश्यक आहेत.

२. प्रात्यक्षिक (Practical) विषयात वर्गकामात कमीत कमी ४० टक्के गुण आवश्यक आहेत.

३. प्रत्येक विषयाच्या वर्गकामात २० गुणांपैकी कमीत कमी ८ गुण आवश्यक असून परीक्षेतही ८० गुणांपैकी ३२ गुण आवश्यक आहेत.

४. सैधंतिक व प्रात्यक्षिक या दोन्ही विषयात एकत्रितपणे ५० टक्के गुण मिळाल्यास द्वितीय श्रेणी, ६० टक्के गुण मिळाल्यास प्रथम श्रेणी व ७० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळाल्यास प्रथम श्रेणीतील विशेष प्राविण्य धरण्यात येईल.

# वर्गकामाचा विषयानुरूप अध्यापनाचा तक्ता

| अ.क्र. | विषय (Subject) | एकूण तास | एकूण वर्गकाम व स्वाध्याय |
|---|---|---|---|
| | **सैधंतिक विषय ( Theory ) गट १** | | |
| १. | जाहिरात कला आणि कल्पना (ADVERTISING ARI & IDEAS) | ०६० | ०६ |
| २. | दृककला विचार प्रसारण शास्त्र इतिहास (HISTORY OF VISUAL COMMUNICATION) | ०६० | ०६ |
| | **प्रात्यक्षिक विषय ( Practical Subject ) गट २** | | |
| ३. | मानवी शरीर रेखाटनाचा अभ्यास (Drawing from Life/Full figure study) | १२० | १० |
| ४. | अक्षरांकन व सुलेखन (Lettering Typography & Calligraphy) | ९० | ०६ |
| ५. | वेष्टन/आवरण संकल्प (Package Design) | ९० | ०६ |
| ६. | दृकविचार प्रसारण संकल्प (Communication Design) | १२० | ०६ |
| ७. | माहितीयुक्त संकल्प (Information Design) | ९० | ०४ |
| ८. | दृकसंवाद (Visualisation) | ६० | ०४ |
| ९. | संस्थात्मक ओळख/प्रतिमा (Corporate Identity) | ९० | ०६ |
| | **पूरक/सहाय्यक विषय ( Subsidiary Subject ) गट ३** | | |
| १०. | ऐच्छिक विषयाची ओळख (५ ऐच्छिक विषय ) (Introduction of Elective Subject) | ९० | प्रत्येक विषयाचे २ वर्गकाम |
| ११. | मुद्रक कला (Printing Art) | ६० | ०२ |
| १२. | मजकुर लेखन कला (Copy Writing) | ३० | ०२ |
| | | ९६० | ५८ |

- ऐच्छिक विषयांतर्गत ५ विषय येतात.

  १) बोधचित्रांकन (Illustration) २) अक्षरांकन (Lettering - Typography)

  ३) छायाचित्रण (Photography) ४) संगणकीय संकल्पना (Computer Graphics) ५) प्रदर्शनीय संकल्पना व मांडणी (Exhibition Design & Display) यासर्व ५ विषयांची ओळख करून त्या संबंधीत वर्गकाम तयार करून घेणे अत्यावश्यक आहे.

# विषयांचा सविस्तर अभ्यासक्रम :-

## सैधंतिक विषय ( Theory ) गट - १ :-

### १. जाहिरात कला आणि कल्पना (Advertising Art & Ideas) :-

जाहिरात कलेची भूमिका- माध्यमे- निवड पध्दती - पारंपारिक व आधुनिक माध्यमे- वस्तु- सेवा- ग्राहक- (अंतर्गत) व आऊटडोअर (बहिर्गत) प्रिंट माध्यमे-इलेक्ट्रॉनिक माध्यमे- औषधे - खेळणी- सौंदर्यप्रसाधने- अन्नवस्त्र- चामडीवस्तू आणि इतर प्रकार यामधील जाहिरातीमध्ये रंगाची भूमिका- त्याची कारणे- परिणाम आणि आव्हाने.

विपणन (मार्केटींग) चा अभ्यास - दुकाने - त्यांचे स्वरूप व मर्यादा-विविध ग्राहकांचा दर्जा - त्यासाठीच्या संधी - विपणन संशोधन (मार्केट रिसर्च)- विपणनचे विविध मार्ग- विक्रीच्या विविध कला- त्याचा ग्राहकांवर होणारा परिणाम (प्रभाव) - विपणनची वर्गवारी - उदा. नियमित- प्रासंगिक- तात्पुरती- विशेष वर्गवारी इत्यादी

जाहिरात संस्थेचे कार्य- तेथील कामानुसार नेमलेले विविध गट - त्यांचे परस्परांशी असणारे संबंध - विविध कामांसाठी लागणारा कालावधी- जाहिरातकला एक व्यवसाय म्हणून त्याचे मुल्य व वर्गवारी- जाहिरात संस्थेत कला विभागाचे महत्त्व- आर्टवर्कचे महत्त्व- आधुनिक ते पारंपारिक तंत्रातील सुधारणा- मुद्रणकला- पुन:र्मुद्रण - माध्यमांचे स्वरूप - आवश्यकता- कागद आणि त्यांचा दर्जा - विविध मुद्रण तंत्राला पर्याय इत्यादी

### २. दृककला विचार प्रसारण शास्त्र इतिहास

### (History of Visual Communication) :-

पर्यावरण - परिसर- प्रसंगानुसार परस्परांशी संबंधीत घटना- माणसाच्या कार्याच्या जागा- उदा. कार्यालये- दुकाने- बँका- हॉटेल- सेवा उद्योग- शिक्षणसंस्था- कारखाने-

कार्यशाळा इत्यादीमधील वेगवेगळ्या माणसांच्या कामांचे स्वरूप- त्यांचे दृकस्वरूप- (जागा-रंग-पोत इ.) दैनंदिन लोकजीवन-व्यवसाय आणि व्यावसायिक उद्योग- करीअर ची निवड-नृत्य-नाट्य-संगीत यांचा दृकअविष्कार- त्यांचे सादरीकरण- कला आणि मानवी सादरीकरणांचे महत्त्व- उदा. चेहरा व हावभाव, शरीरांच्या हावभावी हालचाली-अभिनय-गायन आणि वाद्यसंगीत यांचे सादरीकरण- त्यांचे विचार- संकल्पना- विषयाची मध्यवर्ती संकल्पना- सुसंवाद- पेहराव- नेपथ्य (सेट डिझाईन) त्याचे अंतीम स्वरूप- भारतीय, आशिया आणि पाश्चात्य जगातील ऐतिहासिक विकास- नाट्य सादरीकरण- धार्मिक- सांस्कृतिक-सामाजिक- राजकीय नाटकातील कल्पकता- विविध प्रतिमांचा अभ्यास- द्विमीती-त्रिमीती आकार- वस्तु-प्रॉडक्ट- फर्निचर- आणि इमारतीचे विविध भाग- गॅलरी- व्हरांडे- पायऱ्या-कठडे-जिना- इत्यादी भागातील अंतर्गत आणि बहिर्गत जागा संपूर्ण इमारत- दुकाने-मार्केट- यांचे दृकस्वरूप- प्रसंग परिसर- यातील रंग- प्रकाश- छटा याचे दृक नातेसंबंधातील वैविध्य- हेतू- स्वरूप- परिसर यांचे दृकसंबंध- रंगसंगती- प्रमाण- जागा-मोजमाप-विविध मिती-(डायमेंशन) चे आकार इत्यादी.

मानवी शरीर आणि विविध अवयव- त्यांचे पेहराव- शाळेच्या गणवेशापासून ते फॅशनसंबंधी पेहराव आणि विविध व्यावसायिकांचे पेहराव- उदा. डॉक्टर-वकील-नर्स-पोलिस, मिलिटरी- स्कॉऊट गाईड, एनसीसी, हॉटेल कर्मचारी या सर्वांचे पेहराव- ज्यामधून त्यांचे व्यक्तीमत्त्व प्रगट होईल त्या सर्वांचा अभ्यास.

## प्रात्यक्षिके - (Practicals) गट - २ :-

### ३. मानवी शरीर रेखाटनाचा अभ्यास (Drawaing from Life/Full figure study) :-

संपूर्ण मानवी शरीर रचनेचा अभ्यास- मानवी शरीर रेखाटनाचा विविध बाजूने अभ्यास- चेहऱ्यावरील विविध भाव- चेहरा व संपूर्ण शरीर यावरील छाया -प्रकाशाचा अभ्यास- रेखाटन (लाईन ड्राईंग) रेषा व मास (mass) यांचा अभ्यास.

शरीराच्या विविध हावभावाचा व शरीरशास्त्राचा (Anatomy) अभ्यास- चेहऱ्याचे विविध भाव- हाताच्या मुद्रा- पेहरावामधील हाताच्या लकबी- पोशाखांच्या विविध हालचालीनुसार झालेल्या घड्यांचा (Fold) अभ्यास- मानवाकृतीच्या पार्श्वभूमीचा अभ्यास-

माध्यम- पेन्सिल- इंक (शाई), रंग (जलरंग, पोस्टर रंग, ॲक्रलिक रंग, पेस्टल, क्रेयान) इत्यादीच्या हाताळणीचा अभ्यास.

सभोवतालल्या परिसराची रेखाचित्रे (स्केचींग) - अंतर्गत व बाह्य वातावरणातील मानवी हावभावाची रेखाचित्रे- नैसर्गिक व मानवनिर्मित वस्तुंचा अभ्यास- प्राणी - पक्षी- निसर्ग यांचे चित्रण - इमारती - ऐतिहासिक वास्तू- सार्वजनिक जागा- यांचा यथार्थ दर्शनाचा अभ्यास.

माध्यम - पेन्सिल, पेन आणि इंक, क्रेयॉन, चारकोल, पेस्टल, रंग इ.

**४. अक्षरांकन आणि सुलेखन (Lettering-Typography & Calligraphy) :-**

**अक्षरांकन भाग १ (Typography) (Part I)-**

अक्षरलिपीचा इतिहास व अभ्यास- रोमन व देवनागरी अक्षरांचा अभ्यास- प्रत्येक अक्षराचे व्यक्तीमत्त्व व अक्षरानुभव - अक्षराची द्विमीती-त्रिमीती रचना - अक्षरातून अनुभूती-अक्षरांचे आकार- अक्षरांची एकत्रित मांडणी (ओळ) त्यातून अक्षरामधील मेकॅनिकल आणि ऑप्टिकल अवकाश- तांत्रिक व नजरेमधील अवकाश- `ग्रीड सिस्टिम` चे महत्त्व पुस्तके आणि वर्तमानपत्रातील अक्षरांच्या मांडणीमध्ये `ग्रीड सिस्टिम` चे महत्त्व- अक्षरांकनाचे `दृकसंवादी` माध्यमाचे उपयोग.

**सुलेखन भाग २ (Calligraphy) (Part II)-**

सुलेखनासाठी लागणारे वेगवेगळे टुल्स (Tools) साहित्य साधने-पृष्ठभाग यांचा सुलेखनाच्या अभ्यासातील महत्त्व-रोमन अक्षरांचा अभ्यास त्यांच्या विविध शैली (उदा. राऊंड हॅंड, गॉथिक, चानसेरी) अशा अनेक शैलीपैकी एका शैलीचा अभ्यास इ

संपूर्ण देवनागरी अक्षरलिपीचा अभ्यास - रोमन व देवनागरी या दोन्हीचा एकत्रित अभ्यास- त्यांच्या परस्परांच्या उपयोगातून साकारलेल्या मांडणीचा अभ्यास- प्रमाणपत्रे- गुंडाळीफलक (Scrolls) सन्मानपत्रे इ. साठी सुलेखनाचा उपयोग.

**५. वेष्टन (आवरण) संकल्प (Package Design) :-**

वेस्टन संकल्पनातील मूलभूत सुत्रे - संकल्पतत्वांचा वेष्टन संकल्पनेतील उपयोग- ग्राहकांची मानसिकता- आवडीनिवडी- सहज हाताळणीचे महत्त्व- संरक्षण इ. बाबतीत

वेष्टनाचे महत्त्व- वाहतुकीसाठी सोयीचे व्हावे अशी रचना- त्याची किंमत- साठवून ठेवण्याच्या दृष्टीने त्याच्या आकाराचे महत्त्व- वेष्टन संकल्पातील महत्त्वाचे घटक- लोगो- बोधचिन्ह- नाव- रंग- आकार- मजकूर- कंपनीचे नाव व पत्ता- दर्जा- किंमत- उत्पादनाचा कालावधी इ. चे महत्त्व- वापरून फेकून देणे किंवा पुन्हा- पुन्हा उपयोगात आणणे या दृष्टीने योजना- प्रासंगिक-प्रोत्साहनात्मक- उत्सवानिमित्त- यासाठी वापरले जाणारे साहित्य- कागद- पुठ्ठा-प्लॅस्टिक-पत्रा-धातू पत्रा- कापड इ. वेस्टनाचे प्रकार- लेबल- (स्पॉट व स्कर्ट लेबल) - कार्टन - टॅग- कव्हर्स- सीडी कव्हर्स, कॅसेट कव्हर्स- स्पाऊज इ. शॉपींग बॅग, रॅपींग पेपर्स इत्यादी- पॅकेज मधील माहितीयुक्त साहित्याचे महत्त्व.

### ६. दृक विचार प्रसारण संकल्प (Communication Design) :-

दृकविचार प्रसारण संकल्पामध्ये `प्रिंट` माध्यमातील विशेष महत्त्व- दृकविचार प्रसारणाच्या मूलभूत सूत्रांचा उपयोग- ग्राहकाच्या दृष्टीने विविध माध्यमातील संधी- प्रत्येक माध्यमाचे वेगळेपण- त्यांचे आकार- दृश्य- रूप- कालावधी- विशिष्ट जागेचे महत्त्व- (वर्तमान) पुनःर्मुद्रण, तंत्र इत्यादीचा अभ्यास.

रोजच्या रोज उपयोगात येणारे व अधिक काळ उपयोगात येणाऱ्या वस्तू- संकल्पतत्वांचा उपयोग करून जाहीरात चित्रांचे नियोजन - (वर्गकाम) दृकविचार प्रसारण संकल्पातील विविध प्रकार- प्रेस लेआऊट (वर्तमानपत्रातील जाहीराती) मॅगेझीन लेआऊट (नियतकालिकातील जाहिराती) पोस्टर (भित्तीचित्र), होर्डिंग (भव्य फलक), या विविध माध्यमाच्या रचनेचा विचार करून साकारलेल्या दृकविचार प्रसारण संकल्पनाच्या जाहिरातीचा अभ्यास

उदा. १) प्रेस लेआऊट- आकार ३ कॉलम x ३० सें.मी. किंवा १०० कॉलम सें.मी.

२) मॅगेझीन लेआऊट- पानाचा आकार २१ सें.मी. x २८ सें.मी.

३) भित्तीचित्र - १० इंच x १५ इंच (उभे) किंवा २५ सें.मी. x ३० सें.मी

४) होर्डींग - १० इंच x २५ इंच किंवा २५ सें.मी. x ५० सें.मी (आडवे)

## ८. दृकसंवाद (Visualisation) :- परीक्षेसाठी नाही

विविध संकल्पना कल्पकतेने समजून त्याच विकास करणे- टप्प्या-टप्प्याने त्यातील परिणामकारक कल्पकतेचा विकास- ज्यामुळे कोणताही विद्यार्थी कलेविषयक कोणतीही समस्यांचे निराकरण करू शकेल- सौंदर्यदृष्टी- विषयानुरूप कल्पक पर्याय, तोडगा- शोधून प्रात्यक्षिक तयार करणे.

सुरूवातीला समस्या निराकरणाची साखळी समजून घेणे- जे काही साहित्य उपलब्ध आहे. त्या आधारे पृथ्थकरण करून नेमकी संकल्पना कल्पकतेने वर्गकाम (Practicals) तयार करणे- विविध संकल्पनाचा कल्पकतेने व विविध तंत्रशास्त्राचा अभ्यास करून- कल्पक विचारांचा वेगवेगळ्या संकल्पना कल्पकतेने साकारणे.

## ९. संस्थात्मक ओळख/प्रतिमा (Corporate Identity) :- परीक्षेसाठी नाही

कल्पक पायाभूत पध्दती- शिस्त निर्माण करणे- विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास करणे- योग्य माहितीच्या आधारे विचार प्रसारण करणे- प्रतिकात्मकता- कल्पकतेच्या पायावर आधारीत विकास करणे - वर्गकामात कल्पक मांडणीला प्रोत्साहन देणे- संकल्पना विकसीत करण्याच्या दृष्टीने वर्गकामाची आखणी करणे.

सामाजिक विचार प्रसारणासाठी नैसर्गिक शक्यतांचा शोध- सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आर्थिक, वैद्यकीय, औद्योगिक, प्रतिक चिन्हांचा अभ्यास- अक्षरे आणि प्रतिमा यांचा संयुक्त रचनेचा अभ्यास- बाह्यरेखांकन, पूर्णपणे भरीव किंवा त्रिमीतीयुक्त आभास यांचा अभ्यास- रंगाचे गुणधर्म विचारात घेऊन- प्रतिकात्मकता लक्षात घेऊन रंगाचा उपयोग- बोधचिन्ह, प्रतिके किंवा लोगोटाईप यांचा स्टेशनरी- लेटरहेड, व्हिजीटींग कार्ड, पाकीट आणि इतर माध्यमामध्ये उपयोग- द्विमीती व त्रिमीती संकल्पातील अभ्यास.

## पूरक विषय - गट ३ :-

### १०. ऐच्छिक विषयाची ओळख (Introduction of Elective Subject) :-

**परीक्षेसाठी नाही**

### अ) बोध चित्रांकन (Illustration)

ड्रॉईंग (रेखाटन) विषयातून बोधचित्रांकन- नेमक्या हेतुसाठी केलेले रेखाटन- कथेसाठी केलेले रेखाटन- मुखपृष्ठासाठी साकारलेले चित्र- म्हणजे बोध चित्रांकन होय- दृकप्रसारणातील महत्त्वाचे माध्यम म्हणजे बोधचित्रांकन त्याचे महत्त्व पटवून देणे- वेगवेगळ्या तंत्रशैली- रंग, शाई, पेस्टल, ॲक्रलिक इ. माध्यमातून विषयानुरूप बोधचित्रांकन- बोधचित्रांकन क्षेत्रातील मान्यवर बोधचित्रकार- भारतीय व पाश्चात्य बोधचित्रकार यांची माहिती.

### ब) अक्षरांकन (Lettering Typography) :-

उपयोजित कलेतील महत्त्वाचे अंग म्हणजे अक्षरांकन- रोमनलिपी- देवनागरीलिपी- यांचा इतिहास- त्यांच्या विविध लिपी शैलीचा अभ्यास- त्यातील तांत्रिक अभ्यास- जाड- बारीक- मध्यम अक्षरांकनाचे महत्त्व- एक्सप्रेसीव टॉयपोग्राफी- अक्षरानुभूतीचा अभ्यास.

### क) छायाचित्रण (Photography) :-

कॅमेरा आणि संबंधित साधनांची हाताळणी- चित्रांचे चांगल्या चित्र रचनेत रुपांतर करणे- छायाप्रकाशाचे महत्त्व- फोकसींग आणि शुटींग- डेव्हलपींगसाठीची रासायनिक द्रव्ये- डार्करुममधील डेव्हलपींग प्रक्रिया- प्रिंटींगची तयारी- निगेटीव्ह व पॉझीटीव्ह चे साहित्य (उदा. फिल्म, कागद इ.) छायाचित्रण व त्यासंबंधीत पुन:र्मुद्रणची प्रक्रिया.

### ड) कॉम्प्युटर ग्रॉफीक्स (Computer Graphics) :-

संगणकासंबंधी सविस्तर माहिती- वर्ड प्रोसेसिंग, डिझायनिंग, रेंडरींग, ॲनिमेशन इ. ची माहिती- आधुनिक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरची ओळख- त्यांच्या हाताळण्याच्या पध्दती- कोरल ड्रॉ, इलेस्ट्रेटर, फोटोशॉप, पेजमेकर, फ्लॅश इ. सॉफ्टवेअरची ओळख- करीअरच्या शक्यता- व्यवसाय व व्यवस्थापन यादृष्टीने याचे महत्त्व- डेस्कटॉप पब्लिशिंग (DTP), पेजलेआऊट सॉफ्टवेअरची (पेजमेकर, इनडिझाईन) ओळख.

**इ) प्रदर्शनीय संकल्पना व मांडणी (Exhibition Design & Display) :-**

ट्रॉफीची रचना- काऊंटर डिस्प्लेची मांडणी व त्याचे त्रिमीतीय स्वरूपाचे मॉडेल तयार करणे- सुरूवातीला मॉडेलचा कागदावर द्विमितीय आराखडा तयार करणे- साध्या स्टॉलची संकल्पना तयार करून त्याच्या यथार्थ दर्शनाची (Perspective) माहिती करून घेणे व अंतीम मॉडेल तयार करणे.

**११. मुद्रणकला (Printing) :- परीक्षेसाठी नाही**

मुद्रणासाठी आवश्यक मशिनरीची ओळख- लेटरप्रेस- हॉफटोन मशीन- टाईपसेटींग (खिळ्यांची) माहिती- टाईपसेटींगचा रचनेसाठी उपयोग- प्रिंटींग कॅमेऱ्याचे कार्य- लाईन आणि हॉफटोन प्रिंटींगची ओळख- स्क्रिनप्रिंटींगची ओळख- आर्टवर्क तयार करून त्याचे प्रिंटींग कशा पध्दतीने केले जाईल त्याची माहिती.

**१२. मजकूर लेखन कला (Copy Writing) :- परीक्षेसाठी नाही**

जाहिरातीमध्ये शिर्षक, उपशिर्षक किंवा मजकूर यांचे महत्त्व ग्राहकाला आकर्षक करण्यासाठी शब्दांची रचना- शिर्षक (Headline), उपशिर्षक (Sub Headline) किंवा मजकूर (Text, Copy) यामध्ये शब्दांची आकर्षक मांडणी- अर्थपूर्ण मांडणी- वस्तू- सेवा- सामाजिक विषय याबाबतीत जाहिरात करून ज्याची सविस्तर माहिती करून घेतल्यानंतर परिणामकारक शब्दांची मांडणी करण्यासाठी त्या-त्या भाषेचा सखोल अभ्यास महत्त्वाचा- वाचन महत्त्वाचे- त्यादृष्टीने अभ्यासाची दिशा ठरविणे

सही/-

**प्रा. सी. एन. पाटील**

अध्यक्ष, ललीत कला अभ्यास मंडळ